Presented to Mr Dadaji Apaji Naik
Nilcanth Damodar his sincere
mark of friendship Vrati

## प्रस्तावना

१५-११/०५

नं. १९८० म. ग्रं. सं. ठाणें

विषय: काव्य

लेखक: आ. मा. जोशी

सन: १८८३

संग्रहालय क्रमांक: ३५१

पुस्तकाचें नांव: संगीत उत्तमरामचरित्र नाटक

वे [illegible] ल्या तशा र-
चण्याचे [illegible] त्यांनीं ह्या नाटकांत
करुणादिक [illegible] केले आहेत; तसे मजकडून होणें फार अशक्य आहे. तथापि तशा रीतीनें रचना करणारा सहृदय कवि उत्पन्न होईपर्यंत प्राकृत संगीतप्रिय जनांस भवभूतीसारख्या प्रासादिक कवीचा थोडाबहुत परिचय होईल अशा आशेने हा यत्न केला आहे. कवितेच्या संबंधानें हा माझा पहिलाच यत्न असल्यामुळें दूरान्वय, यतिभंगादि दोष व नजरचुकीनें राहिलेले हस्तदोष ह्याविषयीं रसिक व

( ३ )

Presented to Mr Dadaji ... Nilegirh Damodar his ...

महाराष्ट्र भाषेंत तयार केला;

तो

# खंडेराव मार्तंड जोशी व मंडळी

यांनीं

"निर्णयसागर" छापखान्यांत छापून प्रसिद्ध केला.

शके १८०५. सन. १८८३.

( पुस्तकप्रकाशकानें ह्या पुस्तकासंबंधीं सर्व हक्क आपणाकडे ठेविले आहेत. )

किंमत चार आणे.

ल

...क्ष-

...भवभूतासारख्या रसिक क-वीच्या नाटकातील रसभरित कविता मराठी भाषेंत जशाच्या तशा रचण्याची सहृदयता मजमध्यें मुळींच नसल्यामुळें त्यांनीं ह्या नाटकांत करुणादिक रस जसे मूर्तिमंत प्रगट केले आहेत; तसे मजकडून होणें फार अशक्य आहे. तथापि तशा रीतीनें रचना करणारा सहृदय कवि उत्पन्न होईपर्यंत प्राकृत संगीतप्रिय जनांस भवभूतीसारख्या प्रासादिक कवीचा थोडाबहुत परिचय होईल अशा आशेनें हा यत्न केला आहे. कवितेच्या संबंधानें हा माझा पहिलाच यत्न असल्यामुळें दूरान्वय, यतिभंगादि दोष व नजरचुकीनें राहिलेले हस्तदोष ह्याविषयीं रसिक व

# प्रस्तावना.

कविवर्य श्रीभवभूतिकृत संस्कृत उत्तररामचरित्र नाटकाचें मराठी भाषांतर स्वर्गवासी परशुरामपंत तात्या गोडबोले ह्यांनीं फार सुरस केलें आहे. संगीतरूपानें त्या नाटकाचा प्रयोग रंगभूमीवर झाला असतां र[illegible] व संगीतप्रिय जनांस तो अधिक मनोरंजक होईल असें वाटल्याव-[illegible] वरील नाटकांच्या आधारानें हा कवितासंग्रह मी तयार केला आहे. ह्यांत ज्या पद्यांवर * अशा खुणा केल्या आहेत, तीं स्वर्गवासी गोडबोले ह्यांचीं घेतलीं असून बाकीचीं पद्यें मूळ कवीच्या कवितेंतील भावार्थ लक्षांत आणून मी यथामति रचलीं आहेत. हा कवितासंग्रह मुख्यत्वेंक-रून प्रयोगासाठीं तयार केल्यामुळें कांहीं पद्यें गाळलीं आहेत. पद्यें ताल, सूर व राग ह्यांवर म्हणतां यावीं म्हणून त्यांच्यावर राग व ताल लिहिले आहेत. ह्यांतील कांहीं पदांच्या चाली समजण्यास अवघड होत्या; परंतु आर्यसंगीतोत्तेजक मंडळीनें ह्या नाटकाचे प्रयोग येथील रंगभूमीवर बरेच करून दाखविले, त्यामुळें त्यांच्या चाली प्रेक्ष-कांच्या परिचयांतील झाल्या आहेत. श्रीभवभूतीसारख्या रसिक क-वीच्या नाटकांतील रसभरित कविता मराठी भाषेंत जशाच्या तशा र-चण्याची सहृदयता मजमध्यें मुळींच नसल्यामुळें त्यांनीं ह्या नाटकांत करुणादिक रस जसे मूर्तिमंत प्रगट केले आहेत; तसे मजकडून होणें फार अशक्य आहे. तथापि तशा रीतीनें रचना करणारा सहृदय कवि उत्पन्न होईपर्यंत प्राकृत संगीतप्रिय जनांस भवभूतीसारख्या प्रासादिक कवीचा थोडाबहुत परिचय होईल अशा आशेनें हा यत्न केला आहे. कवितेच्या संबंधानें हा माझा पहिलाच यत्न असल्यामुळें दूरान्वय, य-तिभंगादि दोष व नजरचुकीनें राहिलेले हस्तदोष ह्याविषयीं रसिक व

मार्मिक वाचक क्षमा करून ह्यांतील गुणलेशाचा स्वीकार करतील अशी आशा आहे. हा कवितासंग्रह तयार करीत असतां माझे परममित्र रा० रा० गंगाधर विठ्ठल मोगरे ह्यांनीं कित्येक स्थलीं फेरफार करण्याविषयीं योग्य सूचना केल्याबद्दल मी त्यांचा फार आभारी आहें.

अ. मा. जोशी.

०॥०५. ९१.
२०० २०२

ॐ

# संगीत उत्तररामचरित्र नाटकांतील

## कवितासंग्रह.

### मंगलाचरण.

सूत्रधार.— पद.

राग–झिंजोटी. ताल–धुमाळी.

पूर्णब्रह्म प्रभु दीनदयाघन । भवभयभंजन विश्वपती ॥ इच्छित कार्यारंभीं स्तवितां । विघ्नें सर्व लया जाती ॥ध्रु०॥ संत योगि मुनि विनटुनि निशिदिनिं । ध्यानिमग्न ज्याच्या असती ॥ भक्त मनोरथ कल्पद्रुम जो । मंगलमय मंगलमूर्ती ॥ ॥ पू० ॥ अगम अगोचर करुणासागर । सच्चिद्घन ज्या ह्मणती ॥ तो जगदीश्वर दीनजनोद्धर । देवो सकलां सुख शांती ॥ पूर्ण० ॥ १ ॥

सूत्र०.— पद.

राग–देस. ताल–धुमाळी.

नमन मम आद्य कवीचरणीं ॥ असो ह्या मंगलाचर-

र्णी ॥ ध्रु० ॥ ज्यांच्या अनुग्रहें वाणी । होईल सुधातुल्य
ह्मणुनी ॥ न० ॥ २ ॥

सूत्र०.— **साकी.**

राग–जोगी. ताल–धुमाळी.

विधिवत् ज्याला वाग्देवी ती वश होउनियां राहे ॥
तद्रचितोत्तर रघुचरिताचा प्रयोग मी करिताहें ॥
प्रार्थी रसिक जना । देतिल जे अवधाना ॥ ध्रु० ॥ ३ ॥

सूत्र०.— *** साकी.**

राग–धनाश्री. ताल–धुमाळी.

अरुंधतीसह वसिष्ठ घेउनि रामाच्या ज्या माता ॥
त्याही गेल्या तदाश्रमातें सुखवाया जामाता ॥ ४ ॥

सूत्र०.— **पद.**

राग–कालिंगडा. ताल–धुमाळी.

ऐक नटा मी कथितों सर्वही वृत्त तें तुजला ॥ जें ऐकु-
नि तूं निभ्रम होउनि होशी साह्य मला ॥ ध्रु० ॥ झाली
शांता नामें कन्या दशरथ नृपतीला ॥ अपत्यभावें लोमप-
दातें समर्पि तो तिजला ॥ ऋष्यशृंगें त्या शांतिचा पाणिग्रह
केला ॥ ह्मणुनी ह्मणती जामात असें रघुवंशज त्याला ॥
॥ ऐ० ॥ ५ ॥

सूत्र०.— दिंडी.

राग–लीलांबरी. ताल–दादरा.

करावें मी जरि सत्य भाषणाला ॥ परी नाहीं आधार त्या स्तुतीला ॥ ह्मणी स्त्रीला तैसाच दोष गीला ॥ जडे ऐसी ही त्रिविध लोकलीला ॥ ६ ॥

नट.— पद.

राग–झिंजोटी. ताल–दादरा.

जनापवाद जानकिला नवल काय हें ॥ ध्रु० ॥ लोक धरुनि दुष्टबुद्धि ह्मणति असत्य अग्निशुद्धि । परि रावण गृहवास तिला दोषरूप नोहे ॥ जना० ॥ ७ ॥

नट.— पद.

राग–मुलतानी. ताल–धुमाळी.

जानकिचें मन शांत कराया रामचंद्र झडकरी । जातसे निघुनि अंतःपुरीं ॥ ध्रु० ॥ सहपरिवारें निजकन्येला भेटुनि मिथिलाप्रती । गेला विदेह नगराप्रती ॥ त्यांच्या विरहें वैदेही मनिं होय दुःखित अती । नयनीं अश्रुपूर वाहती ॥ असतां धर्मासनिं रघुपति हें ऐकुनियां अंतरीं । ह्मणे हा स्वजन मोह किति तरी ॥ जा० ॥ ८ ॥

राम.— पद.

राग–जिल्हा. ताल–त्रिवट.

सावध हो जानकी तूं कां होसि मनीं उदास ॥ ध्रु० ॥

आग्रह मुनिचा जाणुनि गुरुजन जाती निघुनी तदाश्रमास ॥
॥ सा० ॥ ९ ॥

सीता.— पद.

राग–पिलू. ताल–धुमाळी.

विकल करितसे आप्तजनांचा विरह भिनुनीं अंतरीं ॥
विवेक करुनी आवरितें मन नावरेचि तें परी ॥
कांहीं न सुचे कांहीं न रुचे राहूं कशी मंदिरीं ॥
क्षणभरही मज चैन पडेना काय करावें तरी ॥ १० ॥

अष्टावक्र.— * श्लोक.

राग–कानडा.

विश्वंभरा प्रसवली तुज राजकन्ये ॥
आहे प्रजापतिसमान पिताहि धन्ये ॥
तूं सून जाहलिस त्यावर पार्थिवाची ॥
ज्याचा असे कुलगुरू रवि मी तसाची ॥ ११ ॥

राम.— साकी.

राग–जोगी. ताल–धुमाळी.

साधारण साधूंची धावे अर्थाकडेस वाचा ॥
परि ह्या मुनिंच्या वाणिकडेची अर्थ धांवतो साचा ॥
सहज रंजविती । मुनिंच्या सुबोधित उक्ती ॥ ध्रु० ॥ १२ ॥

अष्टावक्र.— प्रबंध-

ताल-झंपा.

वसिष्ठोक्ति ऐक कथितों तुला श्रीराघवा रघुवंशोद्भवा जानकिधवा ॥ ध्रु० ॥ महासत्रीं शृंगमुनिच्या । जाईल बहु काळ आमुचा ॥ तूं बाळ तुजशीं कैचा । राज्यानुभव असे ॥ व० ॥ यास्तव तूं फार झटुनी । जनरंजनी यत्न करुनी । यशरूप धन मिळवुनी । प्रजेस सुखि ठेवी ॥ व० ॥१३॥

राम.— पद.

राग-खमाज. ताल-त्रिवट.

लोकरंजनाहुनी अधिक प्रिय स्नेहदयादिक नसती मजला ॥ ध्रु० ॥ दुर्दैवें मज जानकिचाही विरह किंबहुना जरि झाला ॥ लो० ॥ १४ ॥

राम.— पद.

राग-कालिंगडा. ताल-दीपचंदी.

हरहर ! काय असें हें घडलें ॥ ध्रु० ॥
ही जातीनें शुद्धा हिजला नलगे पावन केलें ॥ ह० ॥
तीर्थाग्नीला कवणें द्यावी पवित्रता हें नकळे ॥ह०॥१५॥

राम.— *श्लोक.

राग-कानडा.

कष्टे जना कुलधनें अनुरंजवावें ॥

जें मी दुरुक्त वदलों तुज तें नसावें ॥
जें नित्य सुंदर सुगंध शिरीं धरावें ॥
तें पुष्प काय चतुरें चरणें चुरावें ॥ १६ ॥

राम.— पद.

राग—यमनकल्याण. ताल—धुमाळी.

ब्रह्महितास्तव ब्रह्मादिक सुर बसुनी एकांतीं ॥ जानकी ॥
बहुवर्षें ज्यांकरितां पूर्वीं तपाचरण करिती ॥ जानकी ॥
दीर्घकाळ तप करुनी ज्यांतें वृद्ध मुनि बघती ॥ जानकी ॥
त्याची पाहिल्या तपोमयी ह्या दिव्य अस्त्रमूर्ती ॥जा०॥१७

सीता.— पद.

( चाल—जलभरनजात० )

काढियली जणूं चित्रपटीं ह्या आपुली रमणिय मोहक मूर्ति ॥ ध्रु० ॥ स्निग्ध सुकोमल मांसल ही तनु नील कमलसम जीची कांती ॥ काढि० ॥ लीलेनें शिवचाप भंगिलें मामंजी तें कौतुक बघती ॥ काढि० ॥ १८ ॥

लक्ष्मण.— *दिंडी.

राग—कानडा. ताल—दादरा.

वसिष्ठादिक पातले घरा ज्याहीं ।
तया पूजी तव तात लवलाहीं ॥

पहा गौतम जो शतानंद तोही ।
जनक रायाचा उपाध्याय पाही ॥ १९ ॥

राम.— पद.

राग–झिंजोटी. ताल–त्रिवट.

मला वाटे परिणयवेळा जानकी गे हीच ती ॥
तुझे कर जे गुप्त माझ्या मनेच्छा पुरविती ॥
कंकणांनीं युक्त ते हे किती नामीं दीसती ॥
महोत्साहाच्या ह्या लोकीं मूर्तिच कीं भासती ॥म०॥२०

राम.— *साकी.

राग–जोगी. ताल–धुमाळी.

असतां तात अह्मीं जैं नूतन दार परिग्रह केले ॥
चिंतिति माता सतत आह्मां ते दिवस आमुचे गेले ॥
हरहर! आठवती । दिन ते मजला युवती ॥ ध्रु० ॥२१॥

राम.— पद.

राग–आनंदभैरवी. ताल–दीपचंदी.

काय वदूं त्या समयींचें तें लावण्य जानकीचें ॥ ध्रु० ॥
कुटिल मनोहर कुंतल शोभती जिच्या मस्तकींचे ॥ कुंदक-
ळ्यापरि दंतहि मूग्धची हसणें बघणें बाळपणीचें ॥काय०॥
साहजिक लीला जीच्या जी लाजवी स्वतेजें चंद्रिकेतें ॥ पाहुनि
ऐसे कोमल अवयव मानिति माता मनिं कौतुकातें॥का०॥२२

लक्ष्मण.— पद.

राग-कालिंगडा. ताल-त्रिवट.

शिवशिव! काय ह्मणावें हीला ।
विपरित ऐशा कर्म गतीला ॥ ध्रु० ॥
निजराज्यासन निरवुनी पुत्रा ।
पूर्वज धरिती ज्याला ॥
बाळपणीं धरी राघव ऐशा ।
अरण्यवासव्रताला ॥ वि० ॥ २३ ॥

राम.— पद.

राग-पिलू. ताल-धुमाळी.

रघुकुल वंद्ये पवित्र गंगे असो नमन हें तुला ॥
तव प्रसादें भगिरथ उद्धरी आपुल्या पितरांला ॥ ध्रु० ॥
सगर अश्वमेधास्तव सोडी भूवरी अश्वाला ॥
जाइल निजपद जाणुनि ऐसें इंद्रें तो हरिला ॥
तच्छोधास्तव भगिरथ पूर्वज भेदिति वसुधेला ॥
तैं कपिलमुनि तीव्रतेज तें भस्म करि त्याला ॥
तेव्हां भगीरथ तप करुनी बहू प्रसन्न करी तुजला ॥
तेणें पावन करिशी तयांच्या दीर्घदग्ध तनुला ॥ र० ॥ २५

राम.— अंजनी गीत.

राग-झिंजोटी. ताल-धुमाळी.

अलसलुलित पथिं जातां होती

कमल तंतुसम तव अंगें तीं ॥
तैं पडुनी मम हृदया वरती ।
पहुडलीस सुखें ॥ २५ ॥

राम.— पद.

राग–बहार. ताल–त्रिवट.

तींच हीं सीते तपोवनें ॥
केलीं पवित्र जीं तपोधनें ॥ ध्रु० ॥
नदीतटिं तरुंतलीं जिथें मुनी ।
वसुनि करिति तप विमलमनें ॥ तींच० ॥
सत्कारुनि बहु अतिथि सर्वे ते ।
सेविति ऋपि पाचित धान्यें ॥ तीं० ॥ २६ ॥

राम.— पद.

राग–बेहाग. ताल–त्रिवट.

स्मरतें काय तुला । सुंदरी ॥ ध्रु० ॥
सौमित्रानें इथें आपणा । रंजविलें बहु यत्नें ॥ सुं० ॥
सुरम्य गोदातीरीं आपण । केले बहुत विहार ॥ सुं०॥ २७॥

राम.— पद.

राग–लीलांबरी ताल–दादरा.

एकदिनीं एकशयनीं आपण ह्या स्थळीं ॥
विविध केली करुनि सुखें रात्र कंठिली ॥ ध्रु० ॥
ठेवुनियां शुभ्र गल्ल मम मुखावरी ॥

आलिंगिशी मृदुल करें मज तूं सुंदरी ॥
होय उदित प्रेमचंद्र हृदय पुष्करीं ॥
चित्तवृत्ति तयीं प्रिये केवि रंजली ॥ एक० ॥२८॥

**लक्ष्मण.—** पद.

राग–आनंदभैरवी. ताल–दीपचंदी.

जें कर्म कनक मृगरूप धरोनी । मारिचें आचरिलें ॥
सद्यः कृतसें वाटे मजला । जरि तें दुःसह गेलें गतलें ॥ध्रु०॥
जनस्थानीं जीं केलीं रामें असतीं विलापचरितें ॥
तीं ऐकुनी पाषाणहि रडती वज्रहृदयही तिळतिळ तुटलें ॥जें०।

**सीता.—** अंजनीगीत.

राग–झिंजोटी. ताल–धुमाळी.

आपण माझ्याकारितां प्रियपती । भोगियलीं जीं दुःखें अ-
सती । ऐकवती ना मजलागीं तीं । शोकें उर दाटे ॥ ३० ॥

**लक्ष्मण.—** पद.

राग–जोगी. ताल–धुमाळी.

रामा हे तव नेत्रांतुनि कां । बाष्पबिंदू गळती ॥
विस्तृत होउनि जणूं सांचलें । तडाग महिवरती ॥ ध्रु० ॥
दुःखाचे बहु वेग तुवां जरी । रोंधियले चित्तीं ॥
तरि दाटुनि उर येतां सहजची । बाहेर ते निघती ॥रा०॥
त्वदधर नासापुटें क्षणोक्षणीं । मंद मंद स्फुरती ॥
तेणें जन तूं दुःखित ऐसा । संशय मनिं धरिती ॥रा०॥३१

सं काव्य
८०९



मराठी ... ... ग्रंथ ... ...

राम.— पद.

राग–बागेसरी. ताल–त्रिवट.

सौमित्रा! दुःख तें काय कथूं तुजला ॥ ध्रु० ॥
जो विरहाग्नी सीतेचा मम जाळित होता तनुला ॥ सौ० ॥
तो मर्मस्थित व्रणापरी अजि होई दुस्सह मजला ॥सौ०॥३२॥

सीता.— पद.

राग–पिलू. ताल–धुमाळी.

कसें मन भ्रमलें, अश्रुनीं हे नयन डवडवले ।
शोकाधिन झालें ॥ ध्रु० ॥
दुःसह विरहानलिं मी पतिच्या ।
अवचितची जणुं पडलें ॥ कसें० ॥ ३३ ॥

राम.— पद.

राग–सारंग. ताल–झंपा.

पंपा सरोवर भव्यमनोहार ज्यांतिल सुंदर कलहंस पाहे ॥ धृ०॥ करिति ते पक्षघात कमलें होति कंपित केवि मन रमवीत सुकमलवन हें ॥ प० ॥ ३४ ॥

सीता.— पद.

राग–झिंजोटी ताल–त्रिवटी.

भावोजी नाम सांगा ह्या गिरिचें मजप्रती ॥
कदंबादी वृक्ष कैसे ज्यावरी हे शोभती ॥

कुसुमितसे बघुनी त्यां शिखि हर्षे नाचती ॥
परि येथें नाथ माझे मूर्च्छित कां दीसती ॥आ० ॥३५॥

लक्ष्मण.— * श्लोक.

राग–बागेसरी.

तोहा आहे कुसुमित गिरी माल्यवान् नाम ज्याला ॥
ज्याच्या शृंगीं सतत वसते नूतना मेघमाला ॥

राम.—

वत्सा आतां विरम न पुढें पाहवे तोच योग ॥
आला वाटे फिरुनि मज तो जानकीचा वियोग ॥३६॥

सीता.— पद.

राग–कालिंगडा. ताल–त्रिवट.

परत वनवास करावा ॥धृ०॥ भागिरथीच्या पवित्र उदकें पावन देह मम व्हावा ॥ पर० ॥ ३७ ॥

राम.— *साकी.

राग–जोगी. ताल–धुमाळी.

घालीं माझ्या गळ्यांत सखि तव । श्रम घर्मित कर गार ॥
चंद्रकरस्रावी हा हो मज । चंद्रकांत मणिहार ॥
अथवा शिर अंकीं । ठेउनि पहुडे जानकी ॥ ध्रु० ॥ ३८ ॥

राम.— पद.

राग–परज. ताल–त्रिवट.

मज हें काय होतसे नकळे ॥ ध्रु० ॥

मद, निद्रा, विष, सुखदुःखें वा ॥
मोहभुजगें गिळिलें ॥ मज० ॥
तव स्पर्शें तनु विगलित होउनी ॥
सुस्थिर हें मन झालें ॥ मज० ॥ ३९ ॥

राम.— पद.

राग–झिंजोटी. ताल–दादरा.

भाषण तव मधुर किती प्राणसखे गे ॥
म्लान सजिव सुमना जें फुलवितसे गे ॥
मनमोहनि सकल तनु खुलवितसे गे ॥
त्यातें पिउनि तृषित कर्ण तृप्त होती गे ॥ ४० ॥

राम.— * श्लोक.

लग्नापासुन वर्तमानसमयापर्यंत गेहीं वनीं ॥
रात्रीं वा दिवसास ही शिशुपणीं तैसा पुनः यौवनीं ॥
निद्रेला तव रामबाहुच उशी हा सर्वदा जाहला ॥
जाग्रत् स्वप्न सुषुप्ति यांत न दुजा स्पर्श प्रिये याजला ॥ ४१ ॥

राम.— * श्लोक.

गृहाची ही शोभा तशि अमृतवर्तीच नयना ॥
असेही श्रीखंडापरिस सुखदस्पर्श ललना ॥
हिच्या कंठीं बाहू मृदु शिशिर मुक्ता सुसर हा ॥
हिचें सारें आहे प्रिय परि न साहेचि विरहा ॥ ४२ ॥

राम.— * साकी.

राग–धनाश्री. ताल—धुमाळी.

वैदेहीला कसा तरी परसदनीं निवास घडला ॥
होइल दूषण जनांत हा मज धाक मानसीं पडला ॥
काय करावें न सुचे मजला आतां उपाय कांहीं ॥
जीवित्वाला धिक्कार असो मद्गति बरवी नाहीं ॥४३॥

राम.— * पद.

राग–असावरी. ताल–त्रिवट.

शिव शिव ! दुर्जन ह्मणसी कैसें ॥ सुजन जनाला आजि तूं ऐसें ॥ ध्रु० ॥ इक्ष्वाकुवंशि लोकांस दैवें ॥ हेंच वदाया कारण झालें ॥ शि० ॥ शुद्ध्यर्थ जें अद्भुत कर्म केलें ॥ तें कोण मानिल सत्य दुरेलें ॥ शि० ॥ ४४ ॥

राम.— * श्लोक.

राग–महाड.

बाल्यापासुनि पोशिली प्रियसखी देऊनि त्या त्या प्रिया ॥
अन्याला जरि भिन्नदेह दिसती जी एक चित्ता प्रिया ॥
तीतें छद्म करूनि आज सहसा मी मृत्युला देतसें ॥
जैसा खाटिक पाळिल्या बकरिचा कापी गळा हें तसें ॥४५

राम.— पद.

राग–कालिंगडा. ताल–दादरा.

आतां प्रिये जानकी सोड तूं मला ॥

घोरकर्मचांडाळ मी कापि तव गळा ॥ ध्रु० ॥
भ्रांतिभरें चंदनतरु मानुनीं मला ॥
शीवलीस प्राणसखे ह्या विषतरुला ॥ आ० ॥ ४६॥

राम.— * पद.

राग—जोगी. ताल—धुमाळी.

नकळे होईल गति कैशी ॥ आतां काय करूं ॥ धृ० ॥
विपरित काळाचें लक्षण ॥ झाला जीवलोक निर्वाण ॥
सरलें जगण्याचें कारण । आतां प्राण केवि धरूं ॥ न० ॥
सीतेवांचुनि मजला क्षण । होतिल कल्पासमान जाण ॥
वाटती सोडावे हे प्राण । खोंचुनि बाण काय मरूं ॥ ४७॥ न०

राम.— *पद.

राग—काफी. ताल—दादरा.

जन्मुनी रविवंशीं ऐसा ॥ झालों निर्दय मी कैसा ॥ ध्रु० ॥
जी ही शोभा सदनाची ॥ मूर्तिच केवळ मदनाची ॥
विश्रांति मम हृदयाची ॥ माझी प्राण सखी साची ॥
तिजला घालितसें फांसा ॥ झालों निर्दय मी कैसा ॥ १ ॥
द्यावा बळी राक्षसाला ॥ तैसा टाकितसें हिजला ॥
नाहीं लाज दया मजला ॥ कराया कर्म असें सजला ॥
झाला नसे कोणि ऐसा ॥ झालों निर्दय मी कैसा ॥ २ ॥ ४८

* श्लोक.

रविसुता तटीं राहती मुनी । कारिति उग्र जे तप निशीदिनी ॥

लवण राक्षसें त्रास दीधले । ह्मणुनि तूज हे शरण पातले॥ ४९

राम.— पद.

राग–जोगी. ताल–धुमाळी.

सीता ही अजि वसुंधरे मीं । निरविली तुजला ॥
तव कन्या हें जाणती जन कीं । रक्षीं तूं हिजला ॥ ध्रु० ॥
प्रसवुनियां पुण्य मखीं तूं । ह्या पुण्यशीलेला ॥
अर्पुनि त्वां हिस वंश रघूचा । मंगलप्रद केला ॥ सी०॥५०॥

सीता— पद.

राग–जोगी. ताळ–धुमाळो.

जाती प्रियपति त्यजुनि कसे मज या स्थळीं निजलीला ॥
नकळे कारण काय जहालें जावयास त्यांला ॥ ध्रु० ॥
मजसवें वनविहार कराया येइन असें वदलां ॥
त्या वचनाचा आपणास हो विसर कसा पडला ॥जा०॥५१

---

## अंक २ रा.

वासंती.— पद.

राग–खमाज. ताल–त्रिवट.

उगवला सुदिन आजि जणुं खास । पाहुनियां तव रम्य वनास ॥ ध्रु० ॥ घडला सुकृतें संतसमागम नाहीं पार

सुखास ॥ उ० ॥ अशना योग्य हीं ऋषिधान्यें असती मुनीजनांस ॥ उ० ॥ बघुनिं तवां ह्या फलमूलांतें होतो हर्ष मनास ॥ उ० ॥ १ ॥ ५२ ॥

आत्रेयी.— पद.

राग–खमाज. ताल–त्रिवट.

साधूंच्या अंतरंग गोष्टी अकपट गे एकरूप असती ॥ ध्रु० ॥ विनययुक्त अति गोड वाणि ही प्रीति सदोदित ज्यांच्या चित्तीं ॥ सा० ॥ किमपि नसेची भेद परिचया कल्याणप्रद ज्यांची सुमती ॥ सा० ॥ मागें अथवा पुढें हि प्रेमीं विपर्यास मनिं त्यांच्या नसती ॥ सा० २ ॥ ५३ ॥

आत्रेयी.— दिंडी.

राग–बर्वा. ताल–दादरा.

अगस्त्यादिक जे मुनि इथें रहाती ॥
तत्त्ववेत्ते ज्यां लोक मानिताती ॥
त्यांजपाशीं वेदांत शिकायाला ॥
अलें वाल्मीकीकडुनि या वनाला ॥ ३ ॥ ५४ ॥

आत्रेयी.— पद.

राग–पिलू. ताल–दीपचंदी.

अहा ! कसें जानकि हें घडलें ।
नामचि शेष असे तव उरलें ॥ ध्रु० ॥

गेहीं तुझे आप्तजन जे आले ।
त्यांनींही ऐसेंचि तव वृत्त कथिलें ॥ अहा० ॥
यापरि असती ते जरि वदले ॥
तरि मज प्रत्यक्ष दिससि तूं बाळे ॥ अहा० ॥४॥५५॥

**वासंती.—** **पद.**

राग–धनाश्री. ताल–त्रिवट.

अहा जानकी ! पुनरपि तुजवरि संकट कैसें ओढवलें ॥
निर्दय होउनी दुर्दैवानें दुःख विभागी तुज केलें ॥ ध्रु० ॥
महाभाग तूं असतां रामा काय असें हें आचरिलें ॥
अथवा तुजला काय ह्मणावें जें होणें तें घडलें ॥अ०५॥५६॥

**वासंती.—** **पद.**

राग–काफी. ताल–दीपचंदी.

परि ह्या विपरित कृत्यें ॥ ह्मणतिल निर्दय कीं त्यातें ॥ध्रु०॥
वज्र सुमापरि कठिण मृदुलशीं ॥ अलौकिकांचीं चरितें ॥
असती जाणावीं तीं कवणें ॥ हें तों नकळे मातें ॥ह्म०५७॥

**आत्रेयी.—** **पद.**

राग–धनाश्री. ताल–धुमाळी.

वांचवि द्विजशिशुला ॥ रामा ॥ ध्रु० ॥
शंबुक शूद्रज तपकरि भूवरी ॥
सत्वर वधि त्याला ॥ रामा० ॥ ७ ॥ ५८ ॥

वासंती.— पद.

राग–बेहाग. ताल–त्रिवट.

आत्रेयी, उदयाचल सोडुनि बघ हा दिनकर वर किति चढला ॥ आ० ॥ ध्रु० ॥ पडती सुमनें जलावरी बहु करितां घर्षण गर्जे तरूला ॥ कीं गोदेचें पूजन करिती हे पुष्पित तरु वाटे मजला ॥ आ० ॥ ८ ॥ ५९ ॥

वासंती.— पद.

राग–बहार. ताल–त्रिवट.

रम्य तटस्थ हे तरू कसे ॥ भासती मजला मुनी जसे ॥ ध्रु० ॥ ज्यांवरि बैसुनी वेंचिति कीटक पक्षी हे ज्यां दुःख नसे ॥ र० ॥ ९ ॥ ६० ॥

राम.— * * पद.

राग–पिलू. ताल–धुमाळी.

माझ्या उजव्या करा द्विजशिशु वांचविण्या सत्वरी ॥ टाकी खड्ग त्या विशंक होउनि शूद्रा तपस्व्यावरी ॥ टाकाया पटु जो वनिं प्रियसखी गर्भभरार्ता तशी ॥ रामाचें तूं गात्र असासि त्या तुला दया कायसी ॥ १० ॥ ६१ ॥

शंबूक.— पद.

राग–लीलांवरी. ताल–दादरा.

जयतु जयतु रामभद्र दीनवत्सला ॥ इष्ट हेतु तव

प्रसादें पूर्ण जाहला ॥ ध्रु० ॥ वांचविसी देउनियां अभय त्या मुला ॥ दंडुनियां तनुवैभव देसि तूं मला ॥ चरणीं ह्या लीन असे दास आपुला ॥ घालवि तव हस्तें मरण सकल विपत्तिला'॥ ज० ॥ ११ ॥ ६२ ॥

शंबूक.— *श्लोक.

कोठें शून्य भयंकर ध्वनि कुठें सत्वाचिये ऊठती ॥
कोठें हे ज्वलन प्रसुप्तभुजगश्वासानिलें पेटती ॥
कोठें स्वल्प जळें दरींताहि अशा सीमा पहा दीसती ॥
तान्हेले कर भानुचे अजगर स्वेदद्रवा प्राशिती ॥१२॥६३॥

राम.— *दिंडी.

राग—खर्वा. ताल—दादरा.

तुह्मासंगें राहीन ह्या वनांत ॥
मंद शीतल मधुगंधि वायु ज्यांत ॥
ह्मणत होती कीं प्रिया दिवस रात ।
स्नेह तीच्या तैसाच तो मनांत ॥ १३ ॥ ६४ ॥

राम.— *श्लोक.

राग—कालिंगडा. ताल—धुमाळी.

पुन्हा वन विलोकिलें प्रथम पाहिलें जें असे ॥
जयांत अह्मि जाहलों सुचिर राहणारे असे ॥
गृहस्थहि वनस्थही रतहि आत्मधर्मीं असों ॥
प्रपंचसुख भोगितां कधिं विरक्त झालों नसों ॥१४॥६५॥

राम.— पद.

राग–काफी. ताल–दिपचंदी.

प्रस्त्रवण तो हा गिरी । वाहे ज्यावरि गोदावरी ॥ ध्रु० ॥
घनमालेसम जवळुनिं बघतां । दिसुनिहि ज्यअच्या शिरीं ॥
गृध्र मयूर हि वसती फिरती । मृगबाळें साजिरीं ॥ वाहे०॥

राम.— पद.

राग–देस. ताल–त्रिवटी.

मोहुनि विकल करी । कसा हा मज शोकाग्नी तरी ॥ ॥ ध्रु० ॥ शल्यांशचि वा विषरसभिनला माझ्या सर्व शरीरीं ॥ मो० ॥ अथवा ग्रंथीकृतव्रण फुटुनी वाटे जमला उरीं ॥ मो० ॥ १६ ॥ ६७ ॥

राम.— पद.

राग–देस. ताल–दादरा.

कसा जाऊं पुढें मी हि पंचवटी त्यजून ॥ ध्रु० ॥
निजसदनापरि दिवस प्रियेसह ।
नेले सुखानें जिथें राहून ॥ क० ॥
पवित्र सुंदर परि जी मजला ।
प्रियेविण शून्य गमे पाहून ॥ क० ॥ १७ ॥ ६८ ॥

शंबूक.— पद.

राग–कालिंगडा. ताल–धुमाळी.

श्रीरघुवीरा ह्या वनांतील चमत्कृती ह्या किती ॥

मनाला पहा कशा रिझविती ॥ ध्रु० ॥
कुंजांतिल ह्या उलूकांचे हे घोर ध्वनि ऐकुनी ॥
वसती स्तब्ध काक होउनी ॥
तैसे श्येनस्वना परिसतां भयार्त होती फणी ॥
लपती वृक्षांवरि जाउनी ॥
कैसा क्रौंचावत हा पर्वत दिसतो भव्याकृती ॥
ज्यावरी वृक्षलता शोभती ॥ श्री० ॥ १८ ॥ ६९ ॥

---

## अंक ३ रा.

तमसा.— दिंडी.

राग–लीलांबरी. ताल–दादरा.

पहा गोदेंतुनि जानकी निघाली ॥
पतिस धुंडाया काय वनीं आली ॥
दिसे केवळ कारुण्यमूर्ति साची ॥
व्यथा किंवा प्रत्यक्ष वियोगाची ॥ १ ॥ ७० ॥

मुरला.— पद.

राग–अडाणा. ताल–धुमाळी.

सत्यचि जानकी ही। प्रियसखे स० ॥ ध्रु० ॥
नवकोमल पल्लवसम तनु ती वसे मनीं शोकही ॥प्रि०॥
प्रियपतिविरहें जीच्या चढली पांडुरता देहीं ॥ प्रि० ॥

वासंती.— पद.

राग–पिलू. ताल–त्रिवट.

तो गज निजयुवतिसवें डोहिं क्रीडतसे ॥ ध्रु० ॥
कोमल पल्लव चारुनि प्रेमें ॥
जानकिनें ज्या वाढविलेंसे ॥ तो० ॥
अन्य करी तिरिं येउनि सत्वरि ॥
झुंजाया ज्या गांठितसे ॥ तो० ॥ ३ ॥ ७२ ॥

सीता.— साकी.

राग–पिलू–ताल–धुमाळी.

सजल जलदसम गंभीर हा ध्वनि ॥
येत असे कोठोनी ॥
श्रवणीं पडतां सजीव वाटे ॥
करितो मजलागोनी ॥ ४ ॥ ७३ ॥

तमसा.— पद.

राग–काफी. ताल–त्रिवट.

सखे कां असि उत्सुक होशी ॥ ध्रु० ॥
अव्यक्त ध्वनि वर ही तुजला ॥
कां उद्भवली प्रीति अशी ॥ सखे० ॥
प्रमुदित मेघा बघुनी गगनीं ॥
होते मयूरी तशी ॥ सखे० ॥ ५ ॥ ७४ ॥

राम.— पद.

राग–पिलू. ताल–धुमाळी.

हें तट गिरिचें भव्य मनोहर गोदातटींचें ॥ ध्रु० ॥
असति गुहा बहु जेथें वहाती
ओघ हे निर्झरांचे ॥ हे० ॥
ज्यांतिल तरुमृगसंघहि झाले ॥
बंधुवर्ग मम साचे ॥ हे० ॥
प्रियेसहित मी बहु दिन येथें ॥
क्रमिले दिवस सुखाचे ॥ हे० ॥ ६ ॥ ७५ ॥

राम.— पद.

राग–बिलावर. ताल–त्रिवट.

पंचवटी ही बघतां । ऐसें वाटे मजला ॥ ध्रु० ॥
शोकानल मनिं गुप्तचि होता तो पेटणार बहु आतां ॥पं०॥
मोहरूप हा धूम तयाचा व्यापितसे मम चित्ता ॥पं०॥७॥

सीता.— पद.

( नेसली पितांबर या चालीवर. )

हरहर! काय तरी मी करूं असें कसें घडलें ॥
मूर्च्छित प्राणनाथ झाले । बाई तमसेग ॥ ध्रु० ॥
धरित्यें चरण दीन मी शरण वांचिव तूं त्यांसीं ॥
करी शोकमुक्त मजशीं ॥ बाई तमसेग ॥ ८ ॥ ७७ ॥

तमसा.— पद.

राग-परज. ताल-त्रिवट.

करशील तूंच सजीव याला गे ॥ ध्रु० ॥
हस्त स्पर्श कर नेइल याचा विरहताप लयागे ॥ कर०॥९॥

राम.— पद.

राग-मालकंस. ताल-त्रिवट.

काय नवल हें जहालें । ह्या स्पर्शें मज सजीव केलें ॥ ध्रु० ॥
चंदन वा चंद्रकरांकुर पिळुनी रस जणूं काढियले ॥
अथवा सुखद महौषधीरस मत्तनुशीं लावियले ॥ काय० ॥
मृदु शीतलही मोहक जेणें हृत्तापातें हरिलें ॥
घालवि मूर्छादिक मम मन हें सानंदें जड बनलें ॥का०॥१०

सीता.— अंजनीगीत.

राग-झिंजोटी. ताल-धुमाळी.

आजवरी जो प्रकार घडला ॥ योग्य नसे हें भाषण त्याला॥
प्राणप्रिया कां ह्मणतां मजला ॥ पहा दशा माझी ॥११॥

दिंडी.

राग-लीलांबरी. ताल-दादरा.

असति दुर्लभ बहु पाय मला ज्यांचे ॥
घडे दर्शन अजि दैवबलें त्यांचें ॥
कठिण वचनें त्यां व्यर्थ निंदियेलें ॥
मीच हतभाग्या ह्मणुनि असें झालें ॥ १२ ॥ ८१ ॥

तमसा०.—   पद.

राग-खमाज.   ताल-त्रिवट.

इतकि तूं मोहित कां होसी । ऐक मी कथितें तें तुजसी॥ ध्रु०
निराशेनें खिन्न उदासिन । चित्तीं गे बहु असती ॥ इ० ॥
प्रियपति करुणावचनें ऐकुनी। चंद्रकांतसम द्रवसी ॥ इ० ॥
दीर्घ वियोगें उत्सुक तव मन । कांतसंगमासी ॥ इ० ॥
असतां अवचित पाहुनि त्यातें। प्रेमपूर ये ज्यासी ॥इ०॥१३

राम.—   * साकी.

राग-जोगी.   ताल-धुमाळी.

स्नेहें आर्द्र सुशीतल ऐसा स्पर्श तुझा मज झाला ॥
स्पर्श नव्हे हा मजवरि तूझा मूर्त प्रसाद आला ॥
कोठें तुज पाहूं । विरहदुःख किती साहूं ॥ध्रु० ॥१४॥८३

राम.—   अंजनी गीत.

राग-झिंजोटी.   ताल-धुमाळी.

तुझ्या जवळीं येउनी ज्यानें । आपुल्या चिमण्या दंता-
ग्रानें । अथवा ओढावा शुंडेनें । कर्णपल्लव तो ॥ १ ॥
तोचि सुंदरी पुत्र तुझा हा । गजायुतबळी झाला महा ।
तारुण्याचें सुख तें अहा ! । भोगितसे कैसा ॥ १५ ॥८४॥

राम.—   पद.

राग-धनाश्री.   ताल-धुमाळी.

वासंती गज हा कैसा स्वस्त्रीला रंजवि पाहे ॥ ध्रु० ॥

निरखूनि श्रांत तिजवरि तो करें जलसिंचन करीतो ॥
छत्रापरी निजशुंडेनें पुष्करपत्र धरीतो ॥
बहु प्रेमें प्रियकांतेचा जो श्रम खेद हरीतो ॥
चाल ॥ कमलनाल उपडूनी ॥ दंतें ते चघळूनी ॥
भक्षाया कवळ करूनी ॥ तिजला जो देत आहे॥वा०॥१६

सीता.— पद.

राग–जिल्हा. ताल–धुमाळी.

शिणलें मी व्यर्थ मुलें प्रसवोनी । दैवा तव काय ही क-
रणी ॥ ध्रु० ॥ त्यजितां त्या घोरवनीं तीं तान्हीं ॥ ने
गंगा ज्यां निजसदनीं ॥ चाल० ॥ सखे, पुंसवनहीन तें
केलें ग ॥सखे०॥ सारें अशुभचि हें कसें झालें ग ॥सारें०॥
त्यांच्या त्या मुखकमलां पाहोनी ॥ नाहीं केलें चुंबन त्यांनीं
॥ शिण० ॥ १७ ॥ ८६ ॥

सीता.— पद.

राग–कालिंगडा. ताल–त्रिवट.

फुटे सखे स्तनीं पान्हा । ग आतां ॥ ध्रु० ॥
क्षणभर पुत्रवती जणुं बनुनी ।
करवितसें स्तनपाना ॥ ग० ॥ १८ ॥ ८७ ॥

तमसा.— पद.

राग–खमाज. ताल–त्रिवट.

स्त्रीपुरुषांचीं सुमनें जेंव्हां अति प्रेमें एकरूप असती ॥

॥ ध्रु० ॥ होतो आनंदग्रंथी त्या अपत्यचीं जन सखये ह्मणती ॥ स्त्री० ॥ १९ ॥ ८८ ॥

**वासंती.—** **पद.**

राग–बेहाग. ताल–त्रिवट.

रामा नवल बघ हें । कसा मोर हा छुमछुम नाचे ॥ रा० ॥ ॥ ध्रु० ॥ ज्याचे नूतन चित्रविचित्रचि दिसती पंख अहा ! हे ॥ क० ॥ कितितरि सुंदर गुच्छ शिरीं हा । ज्याच्या शोभत आहे ॥ क० ॥ कदंबावरी बसुनी प्रियेला । रंजवी जो रतिमोहें ॥ कसा० ॥ २० ॥ ८९ ॥

**राम.—** **पद.**

राग–झिंजोटी. ताल–त्रिवट.

हालवुनी नेत्र जेवीं भ्रुकुटीतें चाळवी ।
तें फिरसी तुजला जी अंगुलिनीं पालवी ।
करताला धरुनि प्रेमें ती तुजला नाचवी ।
पुत्रापरी तुज मानी मनिं सौख्या सांचवी ॥हा०॥२१॥९०॥

**राम.—** **पद.**

राग–जिल्हा. ताल–त्रिवट.

ह्या द्विजतरूंस जानकिचें स्मरण होतसे ॥ ध्रु० ॥
घालुनियां उदक क्रमें । पुत्रापरि बहु प्रेमें ।
प्रियेनें हा कदंब श्रमें । वाढविला असे ॥ ह्या० ॥

तयावरी बसुनि सदार । भोगुनियां सौख्य फार ।
ह्या शिखीस आप्त थोर । जो गमतसे ॥ ह्या० ॥२२॥९१॥

वासंती— पद.

( केरव्याच्या चालीवर. )

तेंच हें रम्य शिलातल रामा ॥ ध्रु० ॥
स्वप्रियेसह तूं पहुडसि ज्यावरी ।
स्मरण करी मनिं जनविश्रामा ॥ तेंच० ॥
देई सीता तृण ह्या स्थळीं हरिणा ।
नव्हते ते जात त्यजुनि या धामा ॥तेंच०॥२३॥९२॥

सीता.— पद.

( बाई तूं या आम्रतरुशीं. या चालीवर. )

वासंती हें काय कथिसी । तेणें होतें दुःख आह्मांसीं॥ध्रु०॥
दाउनीयां परिचित वस्तू ।
शोकें व्याकुळ कांगे करिसी ॥ वा० ॥ २४ ॥ ९३ ॥

तमसा.— श्लोक.

( हरिणीवृत्त. )

कुवलयदलस्निग्धें अंगें करी नयनोत्सवा ।
सतत जरि हा पाहों आला तथापि गमे नवा ।
विकल दिसती याचीं अंगें पहा कृश पांढरीं ।
कठिण पडतें जाणायाचें रुचे नयनांतरी ॥ २५ ॥ ९४ ॥

सीता.— पद.

राग–पिलू. ताल–धुमाळी.

स्वप्नीं न कधीं परस्परांचा योग वियोगाचा ॥ सखेग ।
परि दुर्दैवें प्रगटुनि करि तो छळ कसा आमुचा ।
अहा! होतसे दीर्घ वियोगें दुभंग हृदयाचा । सखेग ॥
असो पहातें क्षणभर प्रेमें मुखेंदु मी त्यांचा ॥ २६॥९५॥

तमसा.— पद.

(केरव्याच्या चालीवर.)

झाली किती तव स्थिर वृत्ती गे ॥ ध्रु० ॥
शोकानंदें भरलें उर बहू ।
वाहती अश्रु तव नयनांतुनीं गे ॥ झा० ॥
वाटे तूं न्हाणिसी प्रियकर अपुला ।
ऐसें मजला भासतसे गे ॥ झा० ॥ २७ ॥ ९६ ॥

वासंती.— पद.

राग–झिंजोटी. ताल–त्रिवट.

पुनरपि राम आला सहजचि कीं या वनीं ।
पूजावें तरूंनीं त्या फलपुष्पें अर्पुनी ।
मलयें ह्या तोषवावें मंद मंद वाहुनी ।
रंजवावें मधुर शब्दें शकुंतीं बोलुनी ॥ पु० ॥२८॥९७॥

राम.—                    पद.

राग–काफी.   ताल–दीपचंदी.

विलक्षण होय विकार । मना जो स्पष्टचि द्रवविणार ॥ ॥ वि० ॥ ध्रु० ॥ तरु मृग खग जे पाळियले तिणें देउनी उदक निवार । तें बघतां मज स्मरण प्रियेचें होउनि वारंवार ॥ म० ॥ २९ ॥ ९८ ॥

वासंती.—                    श्लोक.

तव मन किति श्रीरामा हें कठोर असे अहा ! ।
शशिसम जिची कांती तींतें वनीं त्यजिसी महा ।
विजनि गति त्या कैसी झाली असेल तिची तरी ।
सदय असतां नाहीं आली दया तव अंतरीं ॥ ३० ॥९९॥

वासंती.—                    पद.

राग–जोगी.   ताल–घुमाळी.

रामा या तव निर्दय कृत्यें काय वदूं तुजसीं ।
दावुनि प्रेमा बहुत कसें तूं त्यजिलेंस तिजसीं ॥ ध्रु० ॥
हृदय जीव तूं सुधा चंद्रिका विश्रांती मजसीं ।
यापरि तिजला वदुनी मोहीं जो तूं गुंतविसी ॥ रा०॥ ३१ ॥

वासंती.—                    * श्लोक.

कठिण हृदय रामा आवडे कीर्ति तूतें ।
तरि वद अपकीर्ती याहुनी काय मातें ।

वनिं गति अबलेची काय झाली असेल ।
तव हृदयिं नरेंद्रा वाटतें काय बोल ॥३२॥१०१॥

राम.— पद.

राग–कालिंगडा. ताल–दादरा.

वासंती आणिक काय पुससी तूं मला ॥ ध्रु० ॥
मृगनयना गर्भवती सुशील सुंदरी ॥
वाटे वनीं हिंसकजनीं भक्षिलें तिला ॥ वा०॥३३॥१०२॥

तमसा.— पद.

राग–कालिंगडा. ताल–त्रिवट.

याविण अन्य उपाय नसे गे ॥ ध्रु० ॥
शोकातिशय स्थिर कराया ।
रुदनाचि मार्ग असे गे ॥ या० ॥ ३४ ॥ १०३ ॥

तमसा– पद.

राग–काफी. ताल–दीपचंदी.

रोदन लाभाचि झाला । मिळतां अवधि तयाला ॥ ध्रु० ॥
तव विरहानल ज्याच्या सुकवी सुमसम सुंदर तनुला ।
स्वस्त्री त्याग करूनिहि अवघड होता विलाप ज्याला ॥ मि०

राम.— पद.

राग–कालिंगडा. ताल–दादरा.

सोसूं मी किती दुस्सह हें दुःख तरी ॥ ध्रु० ॥

उलतें शोकें हृदयहि माझें । होय न द्विविध जरी ॥
अहा हें ! होय न द्विविध जरी ॥ सो० ॥
जाळी शोकानल तनु आंतुनीं । भस्म न कां तो करी ।
शरिर हें ! भस्म न कां तो करी ॥ सो० ॥
मर्मोद्भेदनविधि करित असे । प्राण न तो कां हरी ।
अजुनि मम ! प्राण न तो कां हरी ॥ सो० ॥३६॥१०५॥

राम.— * श्लोक.

स्थिति निजगृहीं त्या देवीची तुह्मांस न रूचली ।
ह्मणुनि तृणवत् ती म्यां रानीं त्यजूनि न शोचिली ।
परि परिचिता त्या त्या वस्तू न राहविती धिरा !
ह्मणुनि रडतों हा मी येथें क्षमा जनहो करा ॥३७॥१०६॥

राम.— दिंडी.

राग–लीलांबरी. ताल–दादरा.

प्रियाविरहें हा लोक शून्य झाला ।
लोटलेसे तप एकही तयाला ।
तिचें बहुधा जाहलें नष्ट नाम ।
परी आहे जीवंत अजुनि राम॥ ३८ ॥ १०७ ॥

तमसा.— साकी.

राग–जोगी. ताल–धुमाळी.

प्रिय नसति जरी ह्या स्नेहार्द्रा । शोक दारुणा वाचा ॥

पडति तुजवरी मधुधारापरि ज्यांत सविष रस साचा ॥
शोभित कां ह्मणसी । ऐकुनि पति वचनासीं ॥ ध्रु० ॥३९॥

**वासंती.—** पद.

राग–मुलतानी. ताल–धुमाळी.

तेंच हें लतागृह रामा किति रमणीय दीसताहे ॥ ध्रु० ॥
होतास कुंजवनीं ह्या पहात वाट सितेची । ती गोदातटिं उभि होती । बघत क्रिडा हंसाची ॥ चाल ॥ बघुनि खिन्न तुज येतां । शंकूनि करी मनिं चिंता । करुनि भयें प्रणिपाता । प्रेमें ती तुजला पाहे ॥ तें० ॥ ४० ॥ १०९ ॥

**राम.—** पद.

राग–जोगी. ताल–धुमाळी.

झाली विगलित मत्तनु जानकि! हृदय हें फुटतें ।
भासे त्रिभुवन शून्यचि मजला अंतरंग जळतें ॥ ध्रु० ॥
किती धरावें आत्म्यानें तरी ह्या दुःखभारातें ।
मोह व्यापी फिरुनी आतां काय करूं सीते ॥झा० ॥४१॥

**सीता.—** पद.

राग–आनंदभैरवी. ताल–त्रिवट.

अहा ! होती सखे । बघ विकल पती ॥ ध्रु० ॥ कशी होईल ती आतां त्यांची गती । भयें झाली असे मम गुंग मती । शोकें दाटतसे हें ऊर अती ॥ चाल ॥ नसुचे कांहीं मशीं । धीर धरूं कशी । दीन जशी ग ॥ अहा० ! ॥४२॥

राम.—  पद.

राग–जिल्हा. ताल–त्रिवट.

सुखद हा स्पर्श मला सजीव करीतसे ॥ ध्रु० ॥
सुधातुल्य प्रलेपनांनीं । सत्राह्य तेवी मधुनीं ।
सकल तनु विलेपुनी । मोहवीतसे ॥ सु० ॥ ४३ ॥ ११२॥

सीता.—  पद.

राग–बेहाग. ताल–दादरा.

सुखद किती शीतल हा स्पर्श तरी असे ॥
परि सखये मम तनु कां तप्त करितसे ॥ ध्रु० ॥
होती सजड कंपित कर । रोमांचित होय शरीर ॥
सुस्थिर मन झालें अथिर । नयनीं येती प्रेमपूर ॥
पडलें जणूं प्रीतिडोहीं करुं तरी कसें ॥सु० ॥ ४४॥ ११३॥

राम.—  पद.

राग–खमाज. ताल–त्रिवट.

सवलय हस्तें विवाहसमयीं प्रियेचा मी जो कर धरिला ॥ ध्रु० ॥ अमृत मधुरसम सहज स्पर्शें वाटतसे मज तोच किं पहिला ॥ स० ॥ निश्चित हा कर प्राणसखीचा मजला गे अनुभवें समजला ॥ स० ॥ दैवें अवचित पुनरपि झाला मृदु सुखकर हा प्राप्त मजला ॥स०॥ ४५॥ ११४ ॥

राम.— पद.

राग–जोगी. ताल–धुमाळी.

ममकरांतुनि तिचा । हस्त कसा सुटला ॥ ध्रु० ॥
उभयतांचा एकदाचि कर जड कंपित झाला ॥ म० ॥४६॥

तमसा.— * पद.

राग–जिल्हा. ताल–धुमाळी.

होतां प्रियस्पर्शचि हिजला । अंगीं कंप जिच्या सुटला ॥ ध्रु० ॥ घर्में सर्वांगीं भिजली । तनुही रोमांचित झाली ॥ जैशी बकुलिच कीं फुलली । अथवा घनोदकें भिजली ॥ तैसी भासे ही मजला । झाली दूर त्यजुनि पतिला ॥ हो० ॥ ४७॥

वासंती.— पद.

(बहुप्रीतीनें या चालीवर. ताल–धुमाळी.)

करुनि चुराडा इथें टाकिला जटायुनें ज्याचा ॥
तो रामा रथ कृष्णलोहमय पहा रावणाचा ॥
तव बाणें वध होउनि उरला अस्तिशेष ज्यांचा ॥
तोचि दिसे संभार पुढें हा खरादि असुरांचा ॥४८॥११७॥

पद.

राग–पिलू. ताल–धुमाळी.

रामा याच स्थळाला । आणिक अनर्थ जहाला ॥ ध्रु० ॥
खड्गें छेदुनि पंखाला । विकल करी जटायूला ॥ चाल ॥

मेघ जेवी वीजेला । अवलंबी गगनाला ॥
तेवी रावण सीतेला । नेई हरुनी लंकेला ॥रा०॥४९॥११९

**राम.—** **पद.**

राग–धनाश्री. ताल—त्रिवट.

कुठें पाहूं मी तुला जानकी साहूं कसा ह्या दुःखाला ॥
विरहाग्नीच्या तीव्र ज्वाला जाळिती सखये ! मत्तनुला॥ ध्रु०
पुढल्या आशेवर पूर्वींचा वियोग तव म्यां सोसियला ॥
परि या समयींचा नीरवधि हा देइल दुस्सह शोक मला॥५०

**पद.**

राग–तोडी. ताल–त्रिवट.

कवण्या स्थळीं तूं असासि सीते । काय करूं हें नसुचे मातें ॥ ध्रु० लक्ष्मण मारुती नीलादिक ते । शोधिति परि तूं न मिळसी त्यांतें ॥ क० ॥ ५१ ॥ १२० ॥

**सीता.—** **पद.**

राग–खमाज. ताल–त्रिवट.

बाई तमसे ! आतां कैंचें । होइल दर्शन मजला पतिचें ॥
॥ ध्रु० ॥ होती प्राण किती व्याकुळ माझे । उठति वेग ग मानिं विरहाचे ॥ बाई० ॥ ५२ ॥ १२१ ॥

**तमसा.—** **दिंडी.**

राग—बर्वा. ताल—दादरा.

प्रियावर ही तव दृष्टि अढळ झाली ॥
जशी वृक्षा संलग्न होय वेली ॥
वहू यत्नें तूं तीस परत घेसी ॥
परी परतेना व्यर्थ कष्टि होसी ॥ ९३ ॥ १२२ ॥

**सीता.—** **अंजनीगीत.**

राग—झिंजोटी. ताल—धुमाळी.

ज्याच्या पदरीं बहु पुण्याचा । ठेवा त्यासची या चरणांचा ॥ लाभ असे तो मजला कैंचा । व्हावा पापिणीशीं ॥ ९४ ॥ १२३ ॥

**तमसा.—** **पद.**

राग—पिलू. ताल—दीपचंदी.

भेद हे अवघे करुणारसाचे । मोह शोक सुखादिक साचे ॥ ध्रु० ॥ तरंग बुद्बुद आवर्तादिक । असती विकार जेवि जलाचे ॥ भेद० ॥ ९५ ॥ १२४ ॥

**तमसा व वासंती.—** ***श्लोक.**

अवनि अमरसिंधू देवि आह्मांसमेता ॥
मुनि कुलपति तोही बाप ज्याचा प्रचेता ॥

ऋषि कुलगुरु पत्नीयुक्त तोही वसिष्ठ ॥
सतत तुज समर्पूं मंगलें जीं वरिष्ठ ॥ ५६ ॥१२५॥

---

## अंक ४ था.

भांडायन.— दिंडी.

राग–लीलांपरी. ताल–दादरा.

पाक करितां जो ऊत ये तयाची ॥
काढिती ते जी मधुर पेज साची ॥
मिळे अधिं ती नव सूतिका मृगींला ॥
राहिलेली मग पाजिती मृगांला ॥ १ ॥ १२६ ॥

भांडायन.— साकी.

राग–जोगी. ताल–धुमाळी.

होय नित्य व्याकुळ सीतेच्या । हृदयस्थित शोकानें ॥
जैसा ज्वलित वनस्पति होतो । अंतरगत वन्हीनें ॥
दिसतो खिन्न किती ॥ बघ हा जनक भूपती ॥ ध्रु० ॥ २ ॥

जनक.— पद.

राग–ललत. ताल–त्रिवट.

दुर्दैव हें दुरित तुजवरी कैसें उद्भवलें सीते ॥
ज्याच्या योगानें माझें दृढ हृदयही उकललें ॥ ध्रु० ॥

नूतन धारावाही कर्वत कापी जैसा वृक्षातें ॥
तैसा ताप हा कापी मर्मी सतत न साहे मातें ॥ दु० ॥३॥

## पद.

राग–तोडी. ताल–त्रिवट.

काय वदूं कौतुक तें बाळपणींचें । माझ्या प्रियकर जानकिचें ॥ ध्रु० ॥ सहजचि रमवी मन्मनाला ॥ भाषण हसणें बघणें जींचें ॥ आठवतां त्या सुरम्य लीला ॥ पुरतें कोड मनाचें ॥ का० ॥ ४ ॥ १२९ ॥

## पद.

राग–जोगी. ताल–धुमाळी.

भगवती हे वसुंधरे तूं किती निष्ठुर असशी ॥
विपत्ति अपुल्या प्रियकन्येची सोसिलीस कैसी ॥ ध्रु० ॥
गंगा अरुंधति रवि वन्ही वसिष्ठादि मुनिंसीं ॥
शील जिचें श्रुत असुनि असें कां दूषण हें तिजसीं ॥भ०॥

## पद.

राग–आनंदभैरवी. ताल–दीपचंदी.

नीलोत्पलसम ज्याची कांति ।
झुलुपें ज्याच्यां मस्तकिं असती ।
बटूंमध्यें ही चिमणी मूर्ति ।
स्वतेजें बहु शोभत आहे ॥ १ ॥

धरुनी पुनरपी शिशु रूपाला ।
वाटे रघुवीर ह्या वनीं आला ।
कैसा उपजे मोह मनाला ।
बघुनी ह्याच्या साहजिक लीला ॥ ६ ॥१३१॥

**कंचुकी.—** **कटाव.**

पृष्ठिं बांधिले दोन भाते । माजीं भरिले बहुत बाण ते । मुक्तशिखा त्यावरी रूळते । त्रिपुंड्रभाळीं केवि शोभतें ॥ धनुष्याची रज्जू काढुनी । कटिप्रदेशीं घट्ट बांधुनी । रंगविलें चिर मंजिष्ठांनीं । येई अंगावरि तें घेउनि ॥ धरिलें वामकरीं कोदंड । दक्षिणहस्तीं शोभे दंड । रुद्राक्षांचीं वलयें अखंड । शोभति मणगटीं उदंड ॥ सर्वांगाला भस्म लाविलें । कौपिन अधोभागीं रूळे । ऊर्ध्वभागीं मृगाजिन धरिलें ॥ पाहुनी चिन्हें सारीं ॥ वाटे हा क्षत्रिय ब्रह्मचारी ॥ ध्रु० ॥ ७ ॥ १३२ ॥

**जनक.—** **पद.**

राग–मालकंस. ताल–त्रिवट.

झालें सार्थक नेत्रांचें । बघतां मोहक रूप याचें ॥ ध्रु० ॥
जरी हा बाळक वनीं वसे । तरी मज गुणनिधिच भासे ॥
मन्मन हा शिशु ओढितसे । चुंबकमणि जड लोह तसें ॥
किती वर्णूं मी गुण वाचे ॥ झालें० ॥ ८ ॥ १३३ ॥

जनक.— पद.

राग–असावरी. ताल–त्रिवट.

असेल काय दशा झाली । प्रिय वत्से जानकी ! त्या-
कालीं ॥ ध्रु० ॥ केवि भयंकर वेळ ती आली । प्रसवव्यथा
तव वैरिण बनली ॥ अ० ॥ भूतांनीं वनीं धरितां तुजला ।
स्मरत तूं असासिल तेव्हां मजला ॥ असे० ॥ ९ ॥१३४॥

जनक.— *श्लोक.—

हें दुःखात्मक घोर वज्र शिवलें शश्वत् जयाच्या उरा ॥
त्या माझ्या भडकावया अवसर क्रोधानला हा खरा ॥
ध्याया योग्य करीं असे समय हा चापास शापास वा ॥
या काळीं मजला निवारिल बळें कोणी असा दाखवा ॥१०॥

जनक.— * श्लोक.

आहे खराच रघुनंदन पुत्रकल्प ॥
स्त्री बाळ वृद्ध विकल द्विज लोक अल्प ॥
होवो प्रशांत ममचाप तसाच शाप ॥
भावी चुके न जरि ये विधिचाहि बाप॥११॥१३६॥

मुलें.— श्लोक.

( चामरवृत्त. ) ताल–दादरा.

अश्व एक पातला निजाश्रमांत बालका ॥
शुभ्रवर्ण श्यामकर्ण केवि तो दिसे निका ॥

वेग काय दूर जाय सोडुनीहि सैनिका ॥
ऊठ पाहि वाच त्याचि ती शिरस्थ पत्रिका ॥१२॥१३७॥

लव.— पद.

राग–कर्नाटकी. ताल–धमार.

वीर रहिता भूमि ह्मणतां । धिक् तुह्मांतें काय वदतां ॥
दावुनियां शौर्य आतां । हरितों पताका हे ॥ १३॥१३८॥

मुलें.— पद.

राग–भूपाळी- ताल–दादरा.

पाहिजे कशास सांग अश्व हा तुला ॥ त्वरित जाऊं स्वाश्रमासीं आपण ये मुला ॥ ध्रु० ॥ धरुनि मनीं आग्रहासी । जरि तूं हा अश्व धरिसि ॥ परि येईल क्रोध मुनिसि ॥ कथिशिल मग काय त्यासि ॥ यास्तव चल नाचूं उडूं, करूं बहु लीला ॥ पा० ॥ १४ ॥ १३९ ॥

लव०.— *श्लोक.

ज्या हीच जिव्हा घन कोटि दाढा ॥
टंकार हा घर्घर शब्द गाढा ॥
ग्रासावया उद्यत कालवक्त्र ॥
तसें असो हें मम चापयंत्र ॥ १५ ॥ १४० ॥

# अंक ५ वा.

**चंद्रकेतु.—** पद.

राग–लीलावरी. ताल–दादरा.

कोपें कसा होउनियां रक्त दृष्टि हा ॥
बाणवृष्टि सैन्यावरि करितसे पहा ॥
मस्तकिं लोल शिखंड किती शोभती अहा ! ॥
कोणितरी क्षत्रिय वटु हा असे महा ॥ १ ॥१४१॥

**चंद्र०.—** * श्लोक.

एकाकी मुनिबाळ सैनिक बहू त्यांनीं पहा वेढिला ॥
कोणी हा रघुवंशसंभव नवा अंकूर वाटे मला ॥
सोडी बाण सहस्रशा झटझटा फोडी करीमस्तका ॥
शस्त्रांची अतिघोर वृष्टि करितो देतो अह्मां कौतुका ॥२॥४२॥

**सुमंत्र.—** पद.

राग–बेहाग. ताल–त्रिवट.

धनुर्धर रामचि हा ॥ गमे मज० ॥ ध्रु० ॥
रूप वयें त्वतुल्याचि असुनी । भासे चपल महा ॥ गमे० ॥
देवाहुनिही थोर पराक्रम। करितो केवि पहा॥गमे०॥३॥४३॥

**चंद्र०.—** पद.

( प्रबंध ) राग–भूप. ताल–झंपा.

सोडीतसे शर तीक्ष्ण भयंकर भासे महावीर बालपरी

हा ॥ ध्रु० ॥ मूर्च्छित महिवर पाडी बहू वीर कांहीं गत-
धीर सैनिक केले ॥ सो० ॥ ४ ॥ १४४ ॥

सुमंत्र.— * श्लोक.

हा बालवीर पृतनामथना त्यजून ॥
हाकें तुझ्या परतला म्हणि आयकून ॥
मेघध्वनी परिसतांच गजावमर्द ॥
सोडून जेवि फिरतो हरिशाव मर्द ॥ ५ ॥ १४५ ॥

लव.— * श्लोक.

राग–कानडा.

तुम्हीं जो हा केला चहुंकडुनि मोठा गलबला ॥
गिळी माझा क्रोधानल सहज त्या तुच्छ कवला ॥
समुद्राचा ओघ प्रलयपवनानें खवळतो ॥
तरी त्यातें सद्यःक्षुभित वडवाग्नीच गिळितो ॥ ६ ॥१४६॥

चंद्र०— * श्लोक.

ताल–धुमाळी.

त्वदीय गुण पाहतां गमसि सत्य माझा सखा ॥
मदीय जन तो तुझा सकलही न तूं पारखा ॥
निजापरि जनावरी निकर मांडिशी हा कसा ॥
प्रवीर तरी तूं खरा उतरशील माझ्या कसा ॥ ७ ॥१४७ ॥

चंद्र०— पद.

राग–झिंजोटी. ताल–त्रिवट.

मजवरती क्रोधमुद्रा करुनी हा बघतसे ॥
पृष्ठभागीं चमुवरी हा धनु कैसें धरितसे ॥
दों भागीं पवनवेगें घन जैसा हलतसे ॥
तैसा हा धनुर्धारी समरीं या दिसतसे ॥ म० ॥८॥१४८॥

चंद्र०— * श्लोक.

तो एकाकी अगणित तुह्मीं वाहनीं भूमिसंगीं ॥
अंगामध्यें कवच तुमच्या चर्म आहे तदंगीं ॥
तो हा बाल प्रवयस तुह्मी पाहतां त्या तशातें ॥
जिंकायाला विषम समरीं धिक् तुह्मातें अह्मांतें ॥९॥१४९॥

चंद्र०.— पद.

राग–कानडा. ताल–त्रिवट.

ह्या जृंभकवीर्यसारें । केलें विकल हे सैनिक सारे ॥
॥ ध्रु० ॥ होय चकित विद्युत्तममेळीं । दृष्टि तेवि अजि
झालें ॥ के० ॥ १० ॥ १५० ॥

लव व चंद्रकेतु.— * दिंडी.

राग–लीलांबरी. ताल–दादरा.

सहजगत्या संवाद काय झाला ॥
कीं गुणाचा अतिशयिचि फळा आला ॥

अन्य जन्मीं संबंध निविड होता ॥
यामुळें हा परिचयाचि सुदृढ आतां ॥ १ ॥
जन्मकाळींचा गूण कीं उदेला ॥
दैवयोगें अवचीत योग झाला ॥
हृदय माझें पाहून कुमारासी ॥
सावधानें लागतें तयापाशीं ॥ ११ ॥ १५१ ॥

**लव व चंद्रकेतु.—** **पद.**

राग–खमाज. ताळ–त्रिवट.

प्रेमालिंगन द्यावें ह्याला । ऐसें वाटे माझ्या मतिला ॥ ॥ ध्रु० ॥ पाटावापरी मृदु अति सुंदर । दिसते ऐसें ज्याचें शरीर ॥ प्रे० ॥ शंका उपजे मदीयांतरीं । सोडूं कसे शर ह्याच्या तनूवरी ॥ प्रे० ॥ १२ ॥ १५२ ॥

**सुमंत्र.—** **साकी.**

राग–पिलू. ताल–धुमाळी.

मनोरथाचें बीजाचि नेलें । दैवें जेवि हरोनी ॥
होतां छिन्नलता सुमनाशा । राहिल ती कोठोनी ॥ १३॥१५३

**सुमंत्र.—** **दिंडी.**

राग–लीलांबरी. ताल–दादरा.

क्षात्रधर्मे वर्ततां कसें त्यातें ॥
निषेधावें हें योग्य होय मातें ॥

स्वानुमोदन म्यां तरी साहसाला ॥
कसें द्यावें ह्या शूर बालकाला ॥ १४ ॥ १९४ ॥

सुमंत्र.— * श्लोक.

सुरपति रिपुहंता जो तया त्वत्पित्याचें ॥
वय तरि किति सांगूं पाहतां अल्प त्याचें ॥
समरचरित गोष्टी मूळ त्याचें करीतें ॥
दशरथकुल दैवें पावलें सुस्थितीतें ॥ १५ ॥ १९५ ॥

चंद्र०—. साकी.

राग–पिलू. ताल–धुमाळी.

रामा संतति नसतां आह्मां । काय असुनि इतरांतें ? ॥
दुःख सदा हें वाटे अमुच्या । भरतादिक पितरांतें ॥ १६ ॥

लव०— पद.

राग–लीलांवरी. ताल–दादरा.

कुमुदिनी जशी इंदूदयीं हर्ष पावते ॥
तेवि यास बघुनि दृष्टि मम सुखावते ॥
करावया समर येइ स्फुरण बाहुतें ॥
त्वरा करी धरावयास बाहु चाप तें ॥ कु० ॥१७॥

सुमंत्र.— *श्लोक.

देवो तो सविता तुला जय रणीं जो त्वत्कुलाचा पिता ॥
आनंदास वसिष्ठही कुलगुरू जो धर्म संगोपिता ॥

इंद्राग्न्यादिक देवताहि अपुलीं देऊत तेजें तुला ॥
आशी देतिल रामलक्ष्मण निजानंदाचिया हे तुला ॥ १८ ॥

लव.— पद.

राग–आनंदभैरवी. ताल–दीपचंदी.

मानितसों बहु पूज्य मखाला । सत्कारितसों तेवि नृपाला ॥ परि हयरक्षक नीचोक्तीला ॥ ऐकुनी आला त्वेष मनाला ॥ मा० ॥ १९ ॥ १५९ ॥

लव.— पद.

राग–खमाज. ताल–त्रिवट.

असे वीर्य वाणीतची बहूत द्विजांचें ॥
तेवि राहे बाहूंत तें जाण क्षत्रियोंचें ॥ ध्रु० ॥
घेउनियां शस्त्र कां जिकिलें द्विजातें ॥
स्तुत्य कर्म ह्मणसी कसें सांग हें नृपाचें ॥ असे० ॥ २० ॥

चंद्र०.— * श्लोक.

हा कोण संप्रति नवा पुरुषावतार ॥
वाटे जया न बहु भार्गवराम वीर ॥
केली सुखी अभय देउनि सप्तलोकी ॥
जेणें तदीय चरितें हि न जो विलोकी ॥ २१ ॥ १६१ ॥

लव.— पद.

राग—कर्नाटकी. ताल—धमार.

जरि तूं अपणा शूर ह्मणसी । वृद्ध चरितें काय कथिसी ॥ शीघ्र जोडुनि बाण धनूशीं । दावी शौर्या आपुल्या ॥ २२ ॥ १६२ ॥

---

## अंक ६ वा.

राम.— * श्लोक.

दिनकरकुलचंद्रा चंद्रकेतो कुमारा ॥
दृढतर परिरंभा देइ मातें उदारा ॥
तुहिनशकलशीतें कोमलें जीं त्वदंगें ॥
मम हृदय निवो हें त्यांचिया पूर्ण संगें॥१॥१६३॥

लव.— पद.

राग—पिलू. ताल—धुमाळी.

लागलें अवधान बघुनि ह्या मन परवश होतसे ॥
औद्धत्यादि स्थिर करुनि तें नम्रत्वा धरितसे ॥
भक्ति, प्रीति, शांतीचा हा आश्रयची कीं असे ॥
अथवा प्रत्यक्षाचि धर्माचा प्रसाद जणुं हा दिसे ॥२॥१६४

राम.— * साकी.

राग–झिंजोटी. ताल–धुमाळी.

स्पर्श तुझा बा लाजवि विकसित रुचिर कमलगर्भातें ॥
चंदन किंवा विधुसम शीतल सुखद होतसे मातें ॥ ३ ॥

कुश.— *श्लोक.

नरेंद्र सैन्यासह त्या लवाचा ॥
संग्राम तूं बोलसि काय त्याचा ॥
अस्तासि जावो अधिराजशब्द ॥
अस्त्राग्निला वीझवु चापअब्द ॥ ४ ॥१६६ ॥

कुश.— *श्लोक.

देवेंद्रप्रमुखामरांस अभया देऊनि सांभाळिते ॥
संग्रामीं अपुल्या प्रतापशिखिनें शत्रूसही जाळिते ॥
जे झाले रविच्या कुलांत नृपती वैवस्वतापासुनी ॥
त्यांशीं युद्ध घडेल काय दुसरें धन्यत्व तें याहुनी ॥ ५ ॥

राम.— पद.

राग–पिलू. ताल–धुमाळी.

स्नेहें हा प्रत्यंगापासुनी देहसारची काढिला ॥
अथवा चैतन्याचा रस हा मूर्तिमंत प्रगटला ॥
हृदयीं रहाया आनंदाचा निर्झर कीं पातला ॥
वाटे श्लेषमिषें पीयूष घन मजवरती वर्षला ॥ ६ ॥१६८ ॥

मराठी ग्रंथ संग्रहालय

राम.— पद.

राग–मालकंस. ताल–त्रिवट.

पाहतां या उभय शिशूंला । स्नेहें व्यापियलें हृदयाला ॥ ध्रु० ॥ विनय सभ्यता साम्राज्यादिक । चिन्हें हीं असती ज्यांला ॥ रुचिरवपु भाग्यवंत हे । निश्चित भासति मजला ॥ पा० ज्यांची कपोतकंठसम कांती । वृषस्कंधसम शोभा तनुला ॥ मृदंगापरी घोर शब्दही । तीव्र दृष्टि जी लाजवि हरिला ॥ पा० ॥ ७ ॥ १६९ ॥

राम.— पद.

राग–खमाज. ताल–दादरा.

जानकीपरि रूपें हीं दिसती मज ह्यांचीं ॥ ध्रु० ॥
मुक्ताफलतुल्य दंत । सुंदर तनु रक्ताधर ॥
प्रगटलीं जणुं बाल्यरूपें । मम प्रियसखीचीं ॥ जा० ॥ ८ ॥

राम.— *श्लोक.

तिच्या माझ्या स्नेहा अतिपरिचयें खंड न कदा ॥
वसें मी एकांतीं प्रियसखिस कुर्वाळित तदा ॥
करस्पर्शें गर्भ द्विविध मज आधीं समजला ॥
तिला तो मागोनी बहुत दिवसांनीं उमजला ॥ ९ ॥ १७१ ॥

लव.— पद.

राग–भैरवी. ताल–त्रिवट.

शोक तुह्मी कां करितां ॥ ताता० ॥ ध्रु० ॥

भिजलें अश्रुंनीं मुख हें अपुलें । दुःखवेग मनीं येतां ॥ता०॥
हिमाच्छादित कमल तसें जें थिजलें वाटे बघतां ॥ता०॥१०॥

कुश.— *श्लोक.

कसें सीतादेवी विण रघुवरीं दुःख न पडे ॥
प्रियानाशें सारें जग वन तसें केवि न घडे ॥
तसा प्रेमा त्यांचा निरवधि वियोगाधिहि असा ॥
विचारीशी वेड्या अनभिगत रामायण तसा ॥११॥१७३॥

लवकुश.— पद.

राग–भैरवी. ताल–त्रिवट.

स्वभावतां प्रिय होती । श्रीरामाला जानकि ती ॥ध्रु०॥
जिणें स्वगुणें संपादियली ॥ रामाची बहू प्रीती ॥ स्व० ॥
प्राणाहुनि प्रिय मानी ती त्या ॥ दुजा भाव न चित्तीं ॥
॥ स्व० ॥ १२ ॥ १७४ ॥

राम.— पद.

राग–भैरवी. ताल–त्रिवट.

वर्णूं सखीच्या किति सुगुणांला ॥ आले एकदांचि ते उदयाला ॥ ध्रु० ॥ प्रियसखीसह अत्यानंदें । केल्या ज्या मी बहुविध लीला ॥ आठवतां त्या कितितरि होतें । माझ्या दुस्सह दुःख मनाला ॥ वर्णूं० ॥ वयपरत्वें प्रेमा जीचा । दृढ तर मजवरि जरी झाला ॥ परि लज्जा कुलीनत्वें तीच्या । क्रिया धरिती बहु मुग्धत्वाला ॥वर्णूं॥१३॥१७५॥

कुशलव.— पद.

राग–भैरवी. ताल–त्रिवट.

मांडियला तुजसाठीं । शिलामंचक हा ॥ ध्रु० ॥ ज्या समोंवती वर्षला वहु । मोगरा कुसुमें पहा॥ मां० ॥१७६॥

राम.— *श्लोक.

राग–महाड.

गेलें कुंकुम भाळिचें नकळतां घर्मांबुनें ही जरी ॥
शोभे फार ललाट अंकरहिता त्या चंद्रखंडापरी ॥
भूषाहीनहि कर्ण रम्य सुरुची गालांवरी ज्यास तें ॥
गे माझ्या नयनापुढें मुख तुझें प्राणप्रिये दीसतें ॥ १५ ॥

राम.— पद.

राग–भैरवी. ताल–त्रिवट.

करुणा कां आलि तुह्मांला ॥ पाहुनि ह्या अधमाला ॥ ॥ ध्रु० ॥ जनक रघुकुललतेचा जो । चुरी रम्य सुमाला ॥ करु० ॥ १६ ॥ १७८ ॥

---

## अंक ७ वा.

लक्ष्मण.— पद.

राग–परज. ताल–त्रिवट.

येत असे रघुवीर ॥ इथेंची येत० ॥ ध्रु० ॥ वाल्मीकीतें द्यावयाला । गौरव हा रणधीर ॥ इथेंची० ॥१॥१७९॥

सूत्रधार.— पद.

राग–परज. ताल–त्रिवट.

देह सीतेनें अपुला । गंगाप्रवाहीं त्यजिला ॥ ध्रु० ॥ प्रसववेदना घोर वनीं त्या । झाल्या दुस्सह तिजला ॥ साह्य न कोणी ह्मणुनि तिनें ह्यां । आचरिलें साहसाला ॥गं०॥२॥

गंगा व पृथ्वी.— पद.

राग–भैरवी. ताल–त्रिवट.

दुःखित कां मनिं होसी ॥ सीते० ॥ ध्रु० ॥ वंशप्रवर्तक तव सुत असती । चिरंजीव बघ त्यांसीं ॥सीते०॥३॥१८१

गंगा.— पद.

राग–भैरवी. ताल–त्रिवट.

वसुंधरे तूं श्रीरामावरी । कुपित कांगे होसी ॥ बाई कु० ॥ ध्रु० ॥ अग्निविशुद्धा असतां देती । दुर्जन दोष सीतेसी ॥ बाई कु० ॥ ह्मणुनि त्यजिणें प्राप्तचि झालें । विपिनीं तयाला तिजसी ॥ बाई कु० ॥ रघुचें कुलधन हेंचि असे कीं रंजवावें प्रजेसी ॥ बाई कु० ॥ ४ ॥ १८२ ॥

पृथ्वी व गंगा.— पद.

राग–भैरवी. ताल–त्रिवट.

कल्याण असो तुमचें । सततही ॥ ध्रु० ॥ दिव्यास्त्रांनो श्रीरामापरी । करा साह्य मुलांचें ॥ सत० ॥ ५ ॥ १८३॥

राम.— पद.

राग–असावरी. ताल–त्रिवट.

माझी या समयीं, नकळे होइल काय स्थिती ॥ ध्रु० ॥
विस्मयानें करुणरसाचे । उठती वेग मनिं ते मम वाचे ।
किमपिही न वदवती ॥ माझी० ॥ ६ ॥ १८४ ॥

राम.— पद.

राग–भैरवी. ताल–त्रिवट.

कां कष्टि मनीं होसी । भ्रमें करिल संस्कार मुलांचे
कोण असें कां वदसी ॥ सखये कां० ॥ ध्रु० ॥ स्ववंशवर्धक
नंदनजननी । सुजाण बहु तूं असती ॥ वसिष्ठगोत्रा रघुवंशाचा
हें जाणुनि मग ऐसी ॥ सखये कां० ॥ ७ ॥ १८५ ॥

सीता.— पद.

राग–असावरी. ताल–त्रिवट.

घेई मज जननी । उदरीं । घेई मज जननी ॥
दुःखरूप हें जीवित झालें काय करूं मी आतां जगुनी ॥
॥ ध्रु० ॥ पतिपुत्रादिक आप्तजनांचें सुख नसे मजलागोनी॥
कष्ट भोगितें बहु दिन माते ! अनाथ मी या घोरवनीं ॥
अहा ! माझ्यावरची कैसी झाली विधिची दया उणी ॥
उदरीं घे० ॥ ८ ॥ १८६ ॥

लक्ष्मण.— पद. ९

राग–भैरवी. ताल–त्रिवट.

उदकांतूनि निघाली ॥ बघ रामा जानकि ही ॥ ध्रु० ॥
वसुधे पोटीं गंगा तशी जी ॥ होति गुप्त जालें झाली ॥
उ० ॥ ९ ॥ १८७ ॥

सीता.— पद.

राग–भूप ताल–दादरा.

सुदैवें कसें अंतिं अहा ! शुभचि जाहलें ॥
पतिसुतादि आप्तवर्ग मजशिं भेटले ॥ ध्रु० ॥
हर्ष रोष प्रीति नयें हृदय दाटलें ॥
अवचितची सुखभुवनीं जणुं मी पातलें ॥ सु० १०॥१८८

लवकुश.— पद.

राग–भैरवी ताल–दादरा.

धन्य झालों काय वर्णुं सुदिन आजिचा गे ॥ ध्रु० ॥
प्रियजननी विरह तुझा । बहुत सोसिलागे ॥
परि भेटुनि दूर करिसी । शोक हृदयिंचा गे ॥ ध० ॥ ११ ॥

भरतवाक्य.— पद.

राग–भैरव. ताल–दादरा.

कर प्रिय मंगलदायक हें । मंगलदायक हें ॥ध्रु०॥ भव-

भयहारक मोक्षविधायक दुःखविनाशक हे । देई सन्मति रक्षि आज्ञांप्रति करि फलद्रूपा वसुमति हे ॥ पाठण, नर्तन, कीर्तन, वादन, गायन ॥ कर० ॥ सुरुचिर सुस्वर मधुर मनोहर वाणी पंडित मानस हे । कोकिलरवपरि रमवो संतत । दे सुख भवाब्धितारक हे ॥ सुकृती, करिती, नृपती, धरिती, सुमती ॥ कर० ॥ १२ ॥ १९० ॥

समाप्त.